# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २२७/२०२४ दिनांक-१७/०६/२०२४

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात होणार २३१ पोलीस शिपाई पदांकरीता पोलीस भरती.

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०२१ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणानुसार पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार या आस्थापनेवर सन २०२२-२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी २३१ पदे भरण्याकरीता पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येते आहे. वरिल रिक्त २३१ पदाकरीता १५२३ महिला तसेच ६९०० पुरुष असे एकुण ८४२३ अर्ज प्राप्त आहेत.

सदर पोलीस शिपाई भरतीसाठीची मैदानी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ ते २५/०६/२०२४ या दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर प. या ठिकाणी घेण्यात येणार असुन त्याचे लोकेशन पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईटवर प्रसारित करण्यात आले आहे. मैदानी चाचणीमध्ये पुरुषांकरीता १६०० मी. धावणे, १०० मी. धावणे व गोळाफेक तसेच महिलांकरीता ८०० मी. धावणे, १०० मी. धावणे व गोळाफेक चाचण्या घेतल्या जातील.

पोलीस भरती अनुषंगाने सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध कण्यात आलेली आहे.

सद्या मान्सुनचे दिवस असल्याने जर पावसामुळे एखाद्या दिवशी मैदानी चाचणी होवू शकली नाही तर उमेदवारांना पुढची सुयोग्य तारीख दिली जाईल. काही उमदेवारांना वेगवेळया पदांकरीता एका पेक्षा जास्त ठिकाणी आणि एकच दिवशी मैदानी चाचणीकरीता हजर राहण्याची सुचना प्राप्त झाली असेल अशा उमेदवारांना मैदानी चाचणीकरीता दुसरी तारीख दिली जाईल. तारीख बदलुन घेणाऱ्या उमेदवारास तो पहिल्या मैदानी चाचणीस हजर होता याचा लेखी पुरावा दुसऱ्या मैदानी चाचणीवेळी सादर करावा लागेल. काही उमेदवारांना इतर अडचणी असल्यास त्याचे निरसन स्थानिक पातळीवर करण्यात येईल. याकरीता उमेदवारांनी raunak.saraf@mahait.org यावर ईमेल करावा किंवा ०२२/३५००६११४, ७०२१९९५३५२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे सुचित करण्यात येते.

पावसाळा सुरु झाला असल्याने मैदानी चाचणीकरीता येणाऱ्या उमेदवारांनी त्याअनुषंगाने योग्य ती काळजी घ्यावी. तसेच आरोग्याची काळजी घ्यावी. त्याचबरोबर कोणीही मुळ कागदपत्र घेऊन येऊ नये. फक्त कागदपत्रांचे झेरॉक्स कॉपी घेऊन याव्यात.

सदर भरती प्रक्रियेकरीता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे ०१ पोलीस उप आयुक्त, ०५ सहायक पोलीस आयुक्त, ६४ पोलीस अधिकारी, २९६ पोलीस अमंलदार व २४ मंत्रालयीन कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.

-------ooooo-------